# Status of Women at 75th Anniversary of Indian INDEPENDENCE



Dr. Rajani Shikhare
Dr. Pravin Sonune
Dr. Hanmant Helambe
Dr. Santosh Nagre

# Contents

Introduction ........ 1

Government Laws and Policies for Women Empowerment: An Overview ........ 8

Under Representation of Women in Research-Causes and Challenges ........ 16

Under Representation of Women in Research-Causes & Challenges ........ 17

Women Empowernment At 75th Anniversary of India's Independence Through Judicial Activism: An Appraisal ........ 23

Women's Health Issues in 21st Century India ........ 34

Cyber Crimes Against Women and its Prevention ........ 45

Cyber Violence Against Women and Girls: Gender-Based Violence in the Digital Age 59

Cyber Crime Against Women: Strategies to Prevent and Control of Cybercrime ........ 64

Rights, Laws, Policies for Women Empowerment in India ........ 78

"Challenges And Hurdles in The Journey of Women Empowerment at 75th Anniversary Independence" ........ 86

Educational Status of Women at 75th Anniversary of India's Independence ........ 91

'Role of Women's in Environment Conservation' ........ 97

Women Empowerment in India – A Constitutional Analysis ........ 107

Religious and Cultural Divergence and Youth of India in The Novels of Chetan Bhagat ........ 111

Progress of Kabaddi in India ........ 117

Women's Role in Shaping Indian Society ........ 121

भारत की स्वतंत्रता की 75वीं वर्शगांठ पर महिलाओं की भौक्षिक स्थिति ।............................................. 122

भारतीय स्वतंत्रताके 75 वर्ष और स्त्रियोंकि राजकीय स्थित ............................................................. 123

महिलांच्या आरोग्य समस्या आणि उपाय ........................................................................... 135

महिला सक्षमीकरणासाठीचे शासकीय कायदे आणि धोरणे ..................................................... 139

स्वातंत्र्याची 75 वर्ष स्त्री आणि भारतीय संविधान ................................................................ 148

स्थानिक राजकारणातील महिलांची स्थिती : एक चिंतन ........................................................ 153

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व महिलावर्गाच्या वास्तव समस्या . ............................................... 158

स्त्रीयांचा खेळातील सहभाग.............................................................................................. 165

महिला सक्षमीकरणासाठी विविध सरकारी कायदे व योजना : एक अध्ययन................................... 168

भारतीय समाजातील स्त्रियांचे धार्मिक स्थान ...................................................................... 175

भारतीय स्वातंत्र्याची 75 वर्ष आणि महिलांची राजकीय स्थिती ................................................ 181

भारतीय स्वातंत्र्याची ७५ वर्षे आणि महाराष्ट्रातील महिला धोरणांचा आढावा ................................ 186

महिलांच्या आरोग्य विषयक समस्या व उपाय....................................................................... 189

भारतीय स्वातंत्र्याची 75 वर्षे आणि चित्रपटांमध्ये महिला सक्षमीकरण........................................ 200

कोविड 19 आणि महिला हिंसा.......................................................................................... 207

विवेकी राय के उपन्यासों में चित्रित ग्रामीण स्त्री ................................................................... 210

स्वातंत्र्योत्तर हिंदी कविता में चित्रित स्त्री जीवन..................................................................... 217

# स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व महिलावर्गाच्या वास्तव समस्या .

प्रा.पुरुषोत्तम रंगराव चाटे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री शिवाजी कला,वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय मोताळा,जि.बुलडाणा
मोबाईल नंबर-९७६५४४७८४८
इमेल-prchate84@gmail.com

**प्रस्तावना** :-

जिच्या हाती पाळण्याची दोरी I तीच जगाते उद्धारी I

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील वचनाप्रमाणे जगाच्या विकासाची धुरा स्त्रियाकडे आहे.या सृष्टीवर स्त्री-पुरुष या दोन वर्गापैकी स्त्री कडे सृजनत्व अधिकार आहे. कोणत्याही समाजाच्या विकासाचे मापदंड त्या विकासक्षम समाजातील महिला किती सक्षम आहेत यावरून त्या समाजच्या प्रगतीचे मोजमाप करता येते.भारताच्या अधुनिक इतिहासाच्या जडणघडणीत अगणित व्यक्तिरेखा आहेत त्यामध्ये इंदिरा गांधी सारख्या पंतप्रधान पद भूषविणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा समावेश आहे. ज्या समाजात स्त्रिया सक्षम असतात तो समाज सुदृढ व विकासशील असतो.आपल्या देशाचा विचार केला तर ज्या महिलांचे लोकसंखेच्या दृष्टीने जवळपास पन्नास टक्के संख्याबळ आहे. मात्र त्याप्रमाणात शिक्षण,रोजगार,अर्थकारण,समाजकारण,राजकारण यामधील स्त्रियांचा वाटा उपेक्षित असल्याचे दिसते.कारण जागतिक पातळीवरील मानवविकास निर्देशांक,लिंगाधारित निर्देशांक,असमानतेचा निर्देशांक,बेरोजगारी,दारीन्द्र्याचा निर्देशांक इत्यादी मध्ये भारताची होत असलेली पीछेहाट अथवा घसरण वास्तव चित्र स्पष्ट करत आहे.या सर्व मंदावलेल्या स्थितीला स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या अनुशंगाने सकारात्मक विचार होणे आवश्यक आहे.पुरोगामी माहाराष्ट्राच्या राजकारणात महिलांचा वाटा केवळ ७% आहे.महाराष्ट्राची अवस्था जर ही असेल तर इतर राज्याबाबत परिस्थिती अलहिदा.स्वातंत्र्याच्या लढ्यात भारतात व महराष्ट्रात जी आंदोलने उभी राहिली त्यामध्ये स्त्री नेतृत्वाचा सिंहाचा वाटा राहिला आहे.त्यामध्ये राणी लक्ष्मिबाई व सावित्रीबाई फुले या सारख्या अनेक कर्तृत्ववान

महिला या देशाला लाभल्या.त्यांनी समज व देशाला नवी दिशा दिली ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. सर्वसमावेशक विकासाच्या बाबतीत विचार केला तर महिला वर्गवार अन्याय झालेला दिसतो. स्त्री ही आई,बहिण आणि पत्नीची भूमिका पार पाडत कौटुंबिक जबाबदारी समर्थपणे पेलत असते.पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रिया पुरुषावर अवलंबून असल्यामुळे त्यांना निर्णय घेण्यचा फारसा अधिकार नसतो.अधुनिक काळात त्यांना राजकीय,प्रशासकीय व व्यवस्थापन क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने संधी मिळाली पाहिजे,तरच त्यांचा आर्थिक दर्जा सुधारेल व राष्ट्राच्या प्रगतीत त्यांचे योगदान वाढेल.प्रत्येक स्तरावरील महिलांच्या समस्या वेगवेगळ्या आहेत.तरी सर्वसाधारण महिलांच्या समस्याचा विचार केला तर कौटुंबिक समस्या,आरोग्याच्या समस्या,सामाजिक समस्या,शिक्षणाच्या समस्या,चरित्र्य हनन,दुय्यम दर्जा,पक्षपात पणा,बंदिस्त जीवन या सारख्या असंख्य समस्या आहे. करण कुटुंबातील लिंगभेदावर आधारित श्रमविभागणी,मध्यमवर्गीय कुटुंबातील स्त्रियांचे योगदान,राजकीय क्षेत्रातील महिला वर्गाची पदाधिकारी व कार्यकर्ता म्हणून संख्या नगण्य,निर्णय प्रक्रियेपासून कोसोदूर,धर्माधीष्टीत व कौटुंबिक कायदे व त्याचा होणारा दुजाभाव आणि एकूण संपत्तीत स्त्रियांना किरकोळ हिस्सा इत्यादी बाबी पुरोगामी व महासत्ता होणाऱ्या देशाला मारक ठरू नये. कोणत्याही राष्ट्राला सर्वसमावेशक विकास साधण्यासाठी महिला वर्गाला दुर्लक्षून चालणार नाही.

**भारतातील महिला वर्गाची निर्देशंकानुसार स्थिती :-**

जागतिक स्तरावर विकासाचे मोजमाप करण्यासाठी विविध संकल्पना मांडण्यात आल्या.१९९० पासून मानव विकास निर्देशांकानुसार विकासचे मोजमाप करण्यात येत आहे.२०२० च्या मानव विकास अहवालानुसार १८९ देशामध्ये भारताचा क्रमांक १३१ आहे.भारताच्या शेजारी व सार्क मध्ये सभासद असणाऱ्या देशांचा मानव विकास अहवाल आपल्या पेक्षा उत्तम आहे.२०१० पासून लिंगाधारित निर्देशांक काढण्यास सुरुवात झाली.या अहवालात स्त्रियांना राजकीय,निर्णय प्रक्रियेत मिळणारे स्थान,आर्थिक व सामाजिक संधी आणि समानतेचा विचार केला जातो.२०२० नुसार भारताचा हा निर्देशांक ०.४८८ असून एकूण १६२ देशामध्ये भारताचा १२३ व क्रमांक आहे.या निर्देशांकाच्या अहवालानुसार भारतात एकूण महिला पैकी १३.५% महिलांना संसदीय प्रणालीत स्थान मिळते.हायस्कूल पर्यंत चे शिक्षण फक्त २७.७% महिला घेवू शकतात जे की पुरुष ५६.६% घेतात,स्त्रियांचा श्रम बाजारातील सहभाग फक्त २७% आहे त्यावरून स्त्रियांना संधीच्या बाबतीत पराकोटीची असमानता असल्याचे जाणवते.लैंगिक विषमता

निर्देशांकात ०.८३५ असणे म्हणजे निर्देशांक मध्यम पातळीची स्त्री-पुरुष समानता दर्शविते.भरताची स्त्री–पुरुष समानता या पेक्षाही कमी असल्याचे दिसते.या सर्व बाबीचा विचार केला तर आज भारतीय स्वतंत्र्याच्या पाऊणशे वर्षाकडे वाटचाल करत असतांना देशाच्या विकासाकरता स्त्री-पुरुष समानता असणे आवश्यक आहे.

**महिलांच्या विविध समस्या:-**

भारतात ६५% जनता ग्रामीण भागात वास्तव्याला आहे.ग्रामीण व निमशहरी भागात महिला वर्गाचे स्थान नगण्यच असल्याचे दिसून येते. आधुनिक युगात त्यांना राजकीय, प्रशासकीय, व्यवस्थापन क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने संधी मिळाली पाहिजे, तरच त्यांचा आर्थिक दर्जा सुधारेल व राष्ट्राच्या प्रगतीत त्यांचे योगदान वाढेल. प्रत्येक स्तरातील महिलांच्या समस्या वेगवेगळ्या आहेत. तरी सर्वसाधारण समस्यांचा विचार केला तर पुढील प्रमाणे समस्याची वर्गवारी करता येईल. कौटूबिंक व सामाजिक हिंसाचार, शिक्षणाच्या व आरोग्याच्या समस्या इ.

**कौटूबिंक हिंसाचार:-**

भारतीय संस्कृती व रितीरिवाजानुसार स्त्री-पुरुषाचा विवाह होतो.मात्र महिलांना त्यांच्या लग्नानंतर अनेक समस्यांचा सामना करावा लागतो.अशा प्रकारातील समस्या ह्या ग्रामीण व शहरी भागात वेगवेगळ्या असत्तात. आज आपण विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात खूप प्रगती केली, तरी आपल्यातील वैचारिक पातळी विज्ञान व तंत्रज्ञानासारखी उंची गाठण्यास कमी पाडत आहे.जर एकाद्या स्त्री ला आपत्य न झाल्यास किंवा मुलगी झाली व मुलगा होत नसल्यास आई-वडील,सासू-सासरे शोक करतांना दिसतात. महिलांना त्यांच्या मर्जी विरुद्ध गर्भ लिंगनिदान करायला लावतात व मुलगी असेल तर त्या महिलेला दोष दिला जातो.गर्भपात करण्याचे सल्ले दिले जातात. "**ज्याच्या पदरी पाप त्याला मुली आपोआप**" अशा भावना लोकांच्या मनात आहे. म्हणूनच स्त्री भ्रूणहत्या मोठ्या प्रमाणावर होत आहे. कौटूबिंक हिंसाचारात हुंडाबळी, माहेरून पैसे आणण्यासाठी मारहाण, मुले झाले नाहीत किंवा फक्त मुलीच झाल्या म्हणून शारीरिक त्रास, व्यसनी पती असल्याने संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी, चारित्र्यावरून संशय घेणे या सारख्या असंख्य समस्या कुटुंबाच्या दबावामुळे व महिला वर्गाच्या सहनशीलतेमुळे सर्वांसमोर येत नाही.मुलीला घरामध्ये कुठल्याही बाबतीत अगदी तिचे स्वतःचे लग्न केव्हा व्हावे याबाबतसुद्धा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नसते. मुलगी वयात आली

की माता पित्यांना तिचे ओझे वाटू लागते. तिला घरात ठेवणे म्हणजे त्यांना मोठी जबाबदारीच वाटू लागते.मुलगी म्हणजे काचेचे भांडे असते आणि म्हणून घरातील मोठी माणसे तिच्या लग्नाचा निर्णय परस्परच घेऊन टाकतात. मुलीचे लग्न १८ वर्षांपूर्वी करू नये का कायदा सर्वांना मान्य असते. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात मात्र चित्र अगदी उलट दिसते. आजही ग्रामीण भागात विवाहाचे सरासरी वय १५-१७ वर्षे आहे.

**सामाजिक हिंसाचार :-**

मानव हा सामाजिक प्राणी आहे.या समाजात स्त्री-पुरुष हे दोन वर्ग आहेत.निसर्गाने त्यांच्या मध्ये भेद केलेला आहे.आपल्या देशातील पुरुषसत्ताक कुटुंब पद्धतीमुळे समाजात विविध प्रकारे महिलांना त्रास दिला जातो. यात छेडाछेड, विनयभंग, बलात्कार,दुय्यम दर्जा या सारखे अनेक मुद्दे येतात.आजच्या मोबईल क्रांतीच्या युगात तंत्रज्ञानाचे फायदे तसेच असंख्य तोटे सुद्धा आहेत.या साधनाच्या वापर करून विशेष महिला व मुलींच्या बाबतीत अनेक अपराध घडलेले आहेत.एकतर्फी प्रेमातून केला जाणारा असिड हल्ला, चाकू हल्ला. ऑफीस मध्ये काम करणाऱ्या महिलांना अनेकदा छेडाछेडीच्या प्रसंगाला तोंड द्यावे लागते. या सगळ्यामागे महिलांना असलेले दुय्यम स्थान, तिच्यावर प्रस्थापित केलेला मालकीहक्कच कारणीभूत आहे. बहुतांश पुरुषांना असे वाटते की लग्न करून आणलेली स्त्री ही आपल्या मालकीची वस्तू असते. तिच्यावर अन्याय, अत्याचार करणे आपला हक्कच आहे.ती अबला आहे व प्रतिकार करू शकणार नाही असे गृहीत धरूनच स्त्रियांवरील अत्याचार केला जातो. अगदी महाभारतातील द्रोपदी पासून तर वर्तमानातील निर्भया पर्यंत असंख्य घटना याच भारत देशात घडल्या.अत्याचाराच्या घटना घडल्यावर त्याचे पडसाद रस्त्यांपासून संसदेपर्यंत उमटतात.कॅन्डल मार्च निघतो,जलदगती न्यायालयात केसेस चालतात मात्र अशा घटना होऊ नयेत म्हणून जनजागृती करण्यात आपण कमी पडतो.

**शिक्षणाच्या समस्या:-**

महिलांना फक्त चूल आणि मूल एवढ्या संकुचित मानसिकतेतून समाजाने बाहेर पडले पाहिजे.करण देशाचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर महिला वर्गाला समान संधी देणे काळाची गरज आहे.शिक्षण व व्यक्तीच्या विकासाचा मुख्य पाया असतो.स्त्रियांना मात्र शिक्षणापासून जाणीवपूर्वक दूर ठेवण्यात आले.त्या मुळे स्त्री-पुरुष समानता तत्व रुजविण्यात असंख्य अडचणीआल्या.मुली शाळेत जाऊ लागल्या त्या समाजमानसिकतेमुळे नाही तर सरकारने सर्वांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले आहे म्हणून. असे असूनही आज सुद्धा सगळ्या मुली शाळेत जातातच असे नाही. प्राथमिक शाळेच्या नोंदणीच्या वेळी

१०० मुलांमध्ये ४५ मुली असे व्यस्त प्रमाण दिसते. त्याचप्रमाणे घरामध्ये कुठलीही अडचण असो, सर्वात प्रथम घरी ठेवले जाते ते मुलीला. शाळेच्या पटावर नियमित गैरहजर राहणाऱ्या ४ विद्यार्थ्यांपैकी ३ मुलीच असतात. प्राथमिक शाळेत नोंदणी केलेल्या १० मुलींमध्ये केवळ २ मुलीच आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण करू शकतात. मुलींची शाळा चालू राहिली तरी घरातील कामे, जबाबदाऱ्या पारपाडत तिला अभ्यास करावा लागतो. महिला ह्या शिक्षणाच्या क्षेत्रात आजही मागे आहेत.आज वर्तमान काळात मुलींना ग्रामीण भागातून शिक्षणासाठी पाठवले जात नाही. मुलींना शिकून काय करायचं हाच विचार आपल्या समाजत घट्ट रुजला आहे. पण महिलांना शिक्षण दिले तर त्या आपल्या कुटुंबा बरोबरच देशाचा विकास करू शकतात. महिलांसाठी सरकारने विविध शैक्षणिक योजना आणल्या आहेत पण जो पर्यंत समाजाची मानसिकता बदलत नाही तो पर्यंत त्या योजनांचा फायदा महिलांना मिळणार नाही.

**आरोग्याच्या समस्या:-**

भारत देशातील प्रत्येक दोन महिलांमागे एक महिला कोणत्या ना कोणत्या आरोग्याच्या तक्रारीने ग्रस्त आहेत. ३५ टक्के महिला गंभीर स्वरूपाच्या अशक्त आहे. रक्ताशय सारखा आजार जवळ –जवळ बहुतांश महिलांमध्ये आढळून येतो.महिलांसाठी पुरेशा वैद्यकीय सोयी उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या-मध्ये ही समस्या निर्माण झाली असल्याचे मत काही महिला डॉक्टरांनी व्यक्त केले आहे. महिलांच्या जीवनात आरोग्य हा शेवटून प्राधान्याचा विषय असतो. लहान-मोठ्या आजारासाठी महिलावर्गाने डॉक्टरकडे जाण्याची गरज नसते, असे सरसकट मानले जाते. त्यामुळे त्यांचे हे लहान-मोठे आजार बघता बघता गंभीर स्वरूप धारण करतात.विशेष करून कर्करोगाच्या बाबतीत ही गोष्ट लक्षात येते.महिलांची मानसिकता सहनशीलतेची असल्यामुळे त्या कर्करोगाच्या पहिल्या अवस्थेतील त्रास तसाच अंगावर काढतात आणि जेव्हा त्या तपासण्यासाठी म्हणून डॉक्टरकडे जातात तेव्हा कर्करोग पुढच्या अवस्थेत गेलेला असतो. भारतात महिलांमध्ये गर्भाशय व स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाण जास्त आहे. त्यामागचे खरे करण त्यांच्याकडे होणारे दुर्लक्ष हेच कारण आहे. भारतात कुपोषण आणि कुपोषणाची चर्चा खूप होते. अशा कुपोषित बालकांचे अवेळी होणारे मृत्यू ही मोठी गंभीर समस्या मानली जाते.मात्र महिलांमधील कुपोषण गंभीर समस्या आहे. भारतात एकूण लोकसंख्येच्या पन्नास टक्के स्त्रिया आहेत आणि या निम्म्या लोकसंख्येला आज शिक्षण आरोग्य, नोकरी,व्यवसाय इत्यादी सर्वच क्षेत्रामध्ये जाणीवपूर्वक मागे ठेवले जाते. स्त्रियांना फक्त कुटुंबामध्येच नाही तर एकूण समाजातच दुय्यम स्थान आहे. आरोग्य, आहार

याबाबतीत विचार करायचा म्हटला तरीसुद्धा मुलाला प्राधान्य दिले जाते. मुलगा थोडा जरी आजारी पडला तरी त्याला डॉक्टरकडे नेऊन औषधोपचार केले जातात. परंतु मुलगी आजारी पडली तर तिच्याकडे दुर्लक्ष केले जाते. जेव्हा तिचा आजार बळावतो जरा गंभीर स्वरूप धारण करतो तेव्हाच तिला दवाखान्यात नेले जाते. अशी वागणूक देण्यामध्ये कुटुंबातील आई आणि वडील दोघांनाही आपण काही चुकीचे करत आहोत असे वाटत नाही. साहजिकच पाच वर्षाखालील मुलीच्या मृत्यूचे प्रमाण याच वयोगटातील मुलांपेक्षा जास्त असलेले आढळते. तसेच आहारातील पौष्टिक ताजे सकस अन्न घरातील मुलगा व इतर पुरुषांना दिले जाते व लहान मुलगी तिची आई यांना निकृष्ट अन्न मिळते. परिणामी ती मुलगी कुपोषितच राहते.

**जन्माला येतांना समस्या :-**

देशातील बहुतांश भागात आजही मुलगी जन्माला आली की घरातील मंडळी निराश झालेली दिसतात. **"रात्र-दिन अंम्हा युद्धाचा प्रसंग."** अशी अवस्था महिला वर्गाची आहे. शहरी भागात काही सुशिक्षितांमध्ये अशी परिस्थिती नसेल परंतु बहुसंख्य कुटुंबांमध्ये विशेषतः ग्रामीण भागामध्ये हेच चित्र प्रामुख्याने दिसते. किंबहुना मुलगी जन्मालाच येऊ नये, मुलगाच हवा, यासाठी मुद्दाम प्रयत्न केले जातात आणि म्हणून गर्भावस्थेत लिंगपरीक्षा केली जाते. मुलगी ही परक्याचे धन म्हणून वाढवली जाते. तिला बरेचदा नीट वागविले जात नाही.कित्येक डॉक्टर,सोनोग्राफी सेंटर कायदे-कानून धाब्यावर बसवून केवळ पैसा कमविण्यासाठी गर्भलिंग चाचणी करून निष्पाप कळ्या गर्भात खुडण्याचे पातक करतात.महासत्ता उदयास येणाऱ्या देशाला ही अतिशय शरमेची बाब आहे.

**सारांश:-**

आपल्या सामाजिक जडणघडणीमध्ये स्त्रीची भूमिका ही एकाच पद्धतीने रंगवलेली आढळते. स्त्री ही उदात्त कुटुंबातील सदस्यांच्या उन्नतीसाठी त्याग करणारी, इतरांसाठी स्वतःच्या गरजा बाजूला सारणारी अशीच असावी ही अपेक्षा केली जाते आणि ह्या सर्वांची सुरुवात तिच्या जन्मापासूनच झालेली आढळते. आता सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे स्त्रियांनी आपल्या मुला/ मुलींना वाढवतांना समानतेची वागणूक देऊन वाढविले पाहिजे म्हणजे पुन्हा एकदा स्त्रियांनाच आपल्या मुला/ मुलींना अधिक डोळसपणाने व जागरूकतेने वाढविण्याची जबाबदारी पार पाडावी लागणार आहे. आजपासूनच जर घराघरात मुलामुलींना समान वागणूक मिळू लागली तर आज नाही परंतु पुढील दोन तीन दशकांमध्ये आपल्या समाजामध्ये स्त्री

विरोधी भूमिकेचा जोर कमी झालेला दिसेल आणि कुटुंब व समाजामध्ये स्त्रिया आत्मविश्वासाने व निर्भीडपणे वावरताना दिसू शकतील. ज्या कुटुंबामध्ये अशा तऱ्हेने प्रयत्न झालेले आहेत त्या कुटुंबामध्ये स्त्रियांचे स्थान निश्चितपणे उंचावलेले आपल्याला दिसते. आत्मनिर्भर भारतासाठी या देशातील स्वावलंबी झालेल्या स्त्रिया आपल्या पुरुष साथीदारांबरोबर संसाराचा गाडा सक्षमपणे प्रगतीवर नेतील याबद्दल शंका नाही.

**संदर्भग्रंथ :-**


१) भारतीय अर्थव्यवस्था -दत्त सुंदरम-एस.चांद प्रकाशन नवी दिल्ली २०१७

२) भारतीय अर्थव्यवस्था- रमेश सिंह-एमसी.ग्रा.हिल.दिल्ली -२०२०

३) भारतीय अर्थव्यवस्था – डॉ.जी.एन.झामरे पिंपळपूरे प्रकाशन नागपूर (सु.अ.)-२०१६

४) आधुनिक भारताचा इतिहास –डॉ.बी.एल. ग्रोव्हर (सु.अ.)- एस.चांद प्रकाशन नवी दिल्ली २०१७

५) गांधी नंतरचा भारत रामचंद्र गुहा अनुवाद शारदा साठे मॉजेस्टीक पब्लिकेशन मुंबई-२०१८

६) महिला सबलीकरण – डॉ.सुवर्णा सूर्यवंशी-ऑरेंज बुक प्रकाशन धुळे -२०२१


**मासिक:-**


१) लोकराज्य मार्च-२०२१

२) योजना मार्च-२०१७


**अहवाल :-**


१) मानव विकास निर्देशांक अहवाल -२०२०

२) इन्टरनेट संकेतस्थळ-विकासपेडिया

The book is an attempt to analyze the progress achieved towards the women empowerment in particular and gender equality in general at 75th anniversary of India's Independence and also the road ahead in this regard from highlighting the challenges and hurdles and suggesting remedial measures in order to achieve women empowerment in India.



## Dr. Rajani Shikhare

Dr. Rajani Shikhare is working as the Principal of R.B. Attal College, Georai Dist Beed (MS). She is the author of Nirala aur Dinkar ki Kavya Chetna , Stri Vimarsh ke bahane se, Swami Vivekanand Vichar Darshan. She was awarded Hindi Sevi Samman for her contribution in language and literature by Rashtriya Hindi Sevi Mahasangh, Indore(MP). She was honoured as Godawari Udyojak Mahila Purskar for her contribution in educational sector.



## Dr. Pravin Sonune

Dr. Pravin Sonune is the Head, Department of English at R.B. Attal College, Georai. His areas of interests are Feminism, Multiculturalism and Indian Writing in English. He edited a book entitled Changing Nature of Human Relationship.



## Dr. Hanmant Helambe

Mr. Hanmant Helambe is presently working as Head, Department of Public Administration at R. B. Attal College Georai, Dist. Beed(MS). He has to his credit a book on New Trends in Public Administration and one edited book on Disaster Management. His research interest area is Administrative Reforms in India.



## Dr. Santosh Nagre

Mr. Santosh Nagre is presently working as Head, Department of Hindi at R. B. Attal College Georai, Dist. Beed(MS). He is an emerging and passionate scholar in the field of Gender Studies and Feminism. He has published research papers in various national/ international journals.

walnutpublication.com

INDIA • UK • USA

ISBN 978-935574033-5

9 789355 740335